# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 16 August 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १६ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.**

********

***ठळक बातम्या***

- **देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची गरज – ७८ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात पंतप्रधानांचं प्रतिपादन**
- **मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण – मराठवाड्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा**
- **मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत आतापर्यंत ८० लाखापेक्षा जास्त महिलांना लाभ प्राप्त, मुख्यमंत्र्यांची बहिण ही नवीन ओळख मिळाल्याची लाभार्थी महिलांची प्रतिक्रिया**

**आणि**

- **राज्यातल्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार**

***सविस्तर बातम्या***

देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. काल ७८ व्या स्वातंत्र्यदिनी नवी दिल्लीत ऐतिहासिक लाल किल्ल्याच्या तटबंदीवर पंतप्रधानांच्या हस्ते सलग ११ व्या वेळेस ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर ते बोलत होते, ४० कोटी नागरिक जर जुलमी ब्रिटीश सत्ता उलथवून टाकत स्वातंत्र्यप्राप्तीचं उद्दीष्ट साध्य करू शकतात, तर १४० कोटी नागरिक २०४७ पर्यंत

विकसित भारताचं स्वप्न नक्कीच साकार करू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. धर्माच्या आधारावर देशात दोन गट पाडणाऱ्या कायद्यांना आधुनिक युगात स्थान नसल्याचं, मोदी यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

***इस गंभीर विषय पर देश में चर्चा हो। जो कानून धर्म के आधार पर देश को बांटते है, जो उंच नीच का कारण बन जाते है, ऐसे कानुनों को आधुनिक समाज मे कोई स्थान नही हो सकता। अब समय की मांग है, की देश मे एक सेक्युलर सिविल कोड हो। हमने कम्युनल सिविल कोड मे पचहत्तर साल बिताये है। अब हमें सेक्युलर सिविल कोड की तरफ जाना होगा। और तब जा कर के देश मे धर्म के आधार पर जो भेदभाव हो रहे है, सामान्य नागरिक को जो दुरी महसूस होती है, उससे हमें मुक्ती मिलेगी।***

सेमीकंडक्टर उत्पादनात जागतिक नेतृत्वाबद्दल आनंद व्यक्त करत, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आत्मनिर्भरतेसाठी कटिबद्ध असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. जातीयवाद तसंच परिवारवादापासून मुक्ततेसाठी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या एक लाख नवतरुणांना राजकारणात सक्रीय करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. वन नेशन वन इलेक्शनच्या मुद्याचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला. महिला सुरक्षा आणि सक्षमीकरण, शिक्षण, युवक कल्याण, आदी विषयांवरही पंतप्रधानांनी भाष्य केलं.

****

राज्यात ७८ वा स्वातंत्र्यदिन सर्वत्र उत्साहात साजरा झाला. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंत्रालयात ध्वजारोहण करण्यात आलं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यात विधान भवन इथं ध्वजारोहण करण्यात आलं. मराठवाड्यातही ध्वजारोहणासह विविध कार्यक्रमांनी स्वातंत्रदिन साजरा झाला.

****

*Byte...*

****

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ विजय फुलारी यांच्याहस्ते, नांदेड इथं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांच्या हस्ते तर परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात कुलगुरू डॉक्टर इंद्रमणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. मराठवाड्यात इतरत्र सर्व शैक्षणिक संस्था, सामाजित संघटना तसंच शासकीय कार्यालयांमधून ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहास साजरा झाला.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत.**

****

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या पहिल्या हप्त्याचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल या योजनेतल्या लाभार्थ्यांशी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. मुख्यमंत्र्यांची बहिण, अशी नवी ओळख या योजनेमुळं मिळाल्याच्या भावना लाभार्थी महिलांनी यावेळी व्यक्त केल्या. राज्यभरातल्या भगिनींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान वाटल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. ही योजना केवळ निवडणुकीपुरती नाही, तर ती कायम आहे, योजनेकरता या आर्थिक वर्षासाठी पूर्णपणे तरतुद करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत ८० लाखापेक्षा अधिक पात्र महिलांना लाभ मिळाल्याची माहिती, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. उर्वरित पात्र महिलांना सुद्धा उद्या १७ ऑगस्ट पर्यत हा लाभ मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

राज्यात गणेश उत्सवास येत्या सात सप्टेंबरपासून प्रारंभ होत आहे. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे राज्यातल्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. पहिल्या तीन विजेत्या मंडळांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपये पारितोषिक देण्यात येईल. अधिकाधिक मंडळांनी ३१ ऑगस्टपूर्वी अर्ज करून, या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असं आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलं आहे.

****

परभणी इथं लायन्स क्लबच्या वतीनं एक हजार फुट लांबीच्या राष्ट्रध्वजाची फेरी आणि राष्ट्रध्वज सन्मान पथदर्शन काल करण्यात आलं. गांधी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गावरून काढलेल्या या फेरीत शहरातील ५० शाळेतल्या सुमारे पाच हजारावर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

****

जालना पोलिस मुख्यालयातल्या कवायत मैदानाचं नूतनीकरण तसंच विद्युत पथदिवे या कामाचं लोकार्पण पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते काल करण्यात आलं.

दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत उत्कृष्ट काम केल्याबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बी एम थोरात यांचा काल धाराशिव इथं पालकमंत्री तानाजी सावंत यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

****

देशाचं भवितव्य उज्ज्वल करण्याचं काम ग्रंथालयानं करावं असं आवाहन कृषिमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. ते काल बीड इथं शासकीय ग्रंथालयाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलत होते. या ग्रंथालयात पुस्तकांसह डिजिटल पद्धतीनंही ग्रंथसंपदा उपलब्ध राहणार आहे आणि अशा स्वरूपाचं हे राज्यातलं चौथं डिजिटल ग्रंथालय असल्याचं मुंडे यांनी सांगितलं.

****

लातूर इथं माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त विलास सहकारी साखर कारखान्यात रक्तदान शिबीर घेण्यात आलं. यामध्ये ८१ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केलं.

****